# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0462 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**08/09/2026 16:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 27/07/2026

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 27/07/2026

**Time From (वेळेपासून):** 13:39 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:39 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 08/09/2026 **Time (वेळ):** 16:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 020

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 08/09/2026 16:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कापुरवाडी मंडळअधिकारी कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** छाया कडु देवरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रति,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788215086

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संगिता नारायण पुंड | | | 1. ईएमई कालनी, ताजिअहिल्यानग,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.08/09/2026

मी छाया कडु देवरे, वय 37 वर्ष, व्यवसाय-नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8788215086.

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या पदावर 2024 पासुन कार्यरत आहे. दि.27/07/2026 रोजी आम्हास श्री. अजित त्रिपुटे,. पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि. अहिल्यानगर यांनी तक्रारदार श्री.नासिर खान यांचा मोबाईल नंबर देवुन त्यांच्याशी फोनव्दारे संपर्क करण्यास सांगितला.त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार नासिर गुलाब खान यांचेशी आमचे मोबाईलवरून संपर्क केला असता तक्रारदार श्री.नासिर खान यांनी त्यांची लोकसेवीका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळवुन तक्रारदार यांना सदर लोकसेवीका यांनी दि 27/07/2026 रोजी मंडळअधिकारी कार्यालय कापुरवाडी, बु-हानगर येथे भेटणार असल्याचे कळविले. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयानुसार गुन्हा होत असल्याने आम्ही लागलीच मा.उपवनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेतले. त्यावेळी आम्ही पंचांना कळविले की, आमचेशी एक तक्रारदार यांनी मोबाईलवर संपर्क करून त्यांची लाचमागणी सबंधाने तक्रार असल्याची कळविले असुन सदरचे तक्रारदार हे अहिल्यानगर शहरामध्येे सुरक्षित ठिकाणी भेटणार आहेत. आपणास तेथे जावुन त्यांची तक्रार ऐकुन त्याप्रमाणे लाचेची सापळा कारवाई करावयाची आहे. त्या कारवाईत तुम्ही पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? अशी संमती विचारली असता त्यांनी त्यास संमती दर्शविली. त्यानंतर आम्ही कार्यालयात हजर असलेले पोकाॅ.सचिन सुद्रुक, पोकाॅ गायकवाड, पोकाॅ सुपेकर यांना व दोन्ही पंचांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन सापळा कारवाई बाबत माहिती देवुन सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी खाजगी वाहन क्र. एम.एच. 15 के.सी. 8517 या वाहनाने 13/00 वा ला.प्र.वि.कार्यालयातुन निघुन अहिल्यानगर शहरामध्ये सुरक्षित ठिकणी आलो. त्यानंतर काही वेळाने सदर तक्रारदार त्यांच्याकडील दुचाकी वाहनाने तेथे आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. नासिर गुलाब खान वय- 58 वर्ष , धंदा- ट्रॅव्हल व्यवसाय, रा. मुकुंदनगर, ता.जि. अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, "मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहण्यास आहे. मी व माझा मित्र शेख युसुफ अब्दुल अशांनी दि.24/05/2013 रोजी दस्त क्र. अ.न. 1/2916/2013 अन्वये मौजे बु-हाणनगर ता.जि.अहिल्यानगर येथील गट नं 06 प्लाॅट नं 49 चे क्षेत्र. 475 चौ.मी हे खरेदी घेतलेले असुुन त्याबाबतीच नोंद फेरफार क्रं. 6802 अन्वये मध्ये सातबारा उता-यावर झालेली होती. परंतु संगणकीय सातबारा होताना सदरची नोंद कार्यान्वीत झालेली नाही. त्यामुळे आज रोजी सदर प्लाॅटचा संगणीकृत सातबारा निघत नाही. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 155 अन्वये सदर प्लाॅट खरेदीचा ऑनलाईन सातबारा उतारा रन करून मिळणेकामी माझा मित्र युसुफ अब्दुल शेख यांनी दि. 08/12/2025 रोजी मा.तहसिलदार, अहिल्यानगर यांना अर्ज सादर केला आहे. सदरचा अर्ज चौकशी श्रीमती पुंड, मंडळ अधिकारी कापुरवाडी ता.जि.अहिल्यानगर यांच्याकडे आहे. दि. 24/07/2026 रोजी मी सदर अर्जाच्या चौकशी कामी श्रीमती पुंड यांची मंडळ अधिकारी कार्यालय, कापुरवाडी येथे भेट घेतली असता त्यांनी गट नं 06 प्लाॅट नं 49 चे क्षेत्र. 475 चौ.मी पैकी 210.90 चौ.मी ची नोंद संगणीकृत करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी माझ्याकडे 5000/-रूपयाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडील 1000/-रूपये दिले. त्यावेळी श्रीमती पुंड यांनी उर्वरित 4000/- रूपयाची मागणी केली त्यावेळी माझ्या लक्षात आले की, श्रीमती पुंड, मंडळ अधिकारी कापुरवाडी हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. आज रोजी मी त्यांना माझ्या कामासंदर्भाने भेटणार आहे सदर भेट दरम्यान लोकसेवक श्रीमती पुंड, मंडळ अधिकारी कापुरवाडी यांनी

माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. माझा लोकसेवीका श्रीमती पुंड, मंडळ अधिकारी कापुरवाडी यांच्याशी कोणताही भांडणतंटा अगर पैसे उसणवारीचा व्यवहार नाही. त्यांनी मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतीतील पैशातुन हजर करेल.'' अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. नासिर गुलाब खान यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे लोकसेविका श्रीमती पुंड, मंडळ अधिकारी, कापुरवाडी हे तक्रारदार श्री. नासिर गुलाब खान यांनी दिलेल्या लाच मागणीच्या तक्रारीप्रमाणे तक्रारदार नासिर गुलाब खान यांच्या मालकीच्या मौजे बु-हानगर येथील गट नं 06 प्लाॅट नं 49 चे क्षेत्र. 475 चौ.मी पैकी 210.90 चौ.मी ची नोंद संगणीकृत करण्याची प्रक्रिया पुर्ण करणेकरीता लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची ? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाॅईस
रेकाॅ
ड
रचा वापर करण्यात येणार असलेबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना कळविले. त्यानंतर आम्ही व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये एक नि

त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हाॅईस
रेकाॅर्डर चालु करून सदरचे रेकाॅर्डर तक्रारदार श्री. नासिर गुलाब खान यांचे ताब्यात दिला.

तक्रारदार श्री. नासिर गुलाब खान व पंच नं.1 श्रीमती भांगरे यांना तक्रारदार यांच्याकडील दुचाकी वाहनाने लोकसेविका श्रीमती पुंड यांची कापुरवाडी मंडळ अधिकारी कार्यालय, बु-हाणनगर येथे भेट घेण्यासाठी 13/49 वा. सुमारास तक्रारदार व पंच नं.1 श्रीमती भांगरे यांना तक्रारदार यांचेकडील मोटारसायकल ने रवाना केले. त्यानंतर आम्ही, पंच नं. 2 श्रीमती शिंदे व सापळा पथक असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यानंतर 14/38 वा.चे सुमारास तक्रारदार, व पंच नं. 1 श्रीमती भांगरे असे सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडून व्हाॅईस
रेकाॅ
डर ताब्यात घेऊन तो बंद केला. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डरमध्ये फाईल 1/3 अशी तयार झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच नं. 1 श्रीमती भांगरे यांना व त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेविषयी विचारले त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष पडताळणी दरम्यान व्हाॅईस
रेकाॅ
ड
र मधील संभाषण ऐकले असता त्यामध्ये लोकसेविका श्रीमती पुंंड व तक्रारदार श्री. नासिर खान यांच्यात तक्रारदार यांच्या

त्यानंतर दि. 04/08/2026 रोजी तक्रारदार यांचे सांगणेवरून सापळा कारवाई आयोजित केली. त्यावेळी आम्ही सांगितलेप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेविका पुंड यांना देण्यासाठी 4000/-रुपये लाच रक्कम हजर केली. त्यावेळी सापळा कारवाई बाबतच्या आवश्यक त्या सर्व तपासण्या व कार्यवाही करण्यात आली. व सदरची लाच रक्कम तक्रारदार यांच्या ताब्यात दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेविका पुंड हे कार्यालयात उपस्थित आहे अगर कसे? याबाबत माहिती घेण्यासाठी सांगितले असता लोकसेविका पुंड हे कार्यालयात उपस्थित नसलेबाबत माहिती समजली. त्यावेळी तक्रारदार यांचे सांगणेवरून सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दि.27/08/2026 रोजी तक्रारदार श्री.नासिर खान यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे समक्ष येवुन आम्हास कळविले की, माझे घर हे कापुरवाडी मंडळ अधिकारी कार्यालय, बु-हानगर येथुन जवळ असल्याने मी ब-याच वेळा त्यांचे कार्यालयाजवळ जावुन लोकसेविका पुंड यांच्याबाबत चौकशी केली असता ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित नव्हते. तसेच लोकसेविका पुंड यांचा हस्ते परहस्ते निरोप देखील मिळाला नाही. तसेच दि.25/08/2026 रोजी मी लोकसेविका पुंड यांना फोन केला. त्यावेळी लोकसेविका पुंड हया मला म्हणाल्या की, "तुमचे काम माझ्याकडे राहीलेले नाही ते मी तहसिल कार्यालय, अहिल्यानगर येथे पाठविले असुन तुम्ही तहसिल कार्यालय, अहिल्यानगर येथे तुमच्या कामाचा पाठपुरवा करावा, माझी भेट घेवु नका"? असे सांगितले. त्यामुळे माझ्या असे लक्षात आले की, लोकसेविका पुंड यांना माझा काहीतरी संषय आला असावा, म्हणुन ते कार्यालयात देखील उपस्थित राहत नाही. तसेच त्यांनी मला त्यांची भेट घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे माझी अशी खात्री झाली की, लोकसेविका पुंड ,मंडळ अधिकारी यांनी माझ्या मालकीच्या मौजे बु-हानगर येथील गट नं 06, प्लाॅट नं 49 चे क्षेत्र 475 चौ मी पैकी 210.90 चौ.मी ची नोंद संगणीकृत करण्याची प्रक्रिया पुर्ण करणे करीता मागणी केलेली 4,000/-रुपये लाच रक्कम ते भविष्यात माझ्याकडुन स्वीकारणार नाही, करिता सदरची

कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात यावी व आज पावेतो झालेल्या कार्यवाहीवरुन लोकसेविका श्रीमती पुंड मंडळ अधिकारी कापुरवाडी यांचे विरुध्द कारवाई करण्यात यावी. त्याप्रमाणे सर्वानुमते तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे प्रस्तुत कारवाई स्थगित करण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. नासिर खान यांनी सापळा कारवाई पुर्णतःस्थगित करणेबाबत वर सांगितलेल्या कारणाप्रमाणे त्यांचा तसा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला. त्यानंतर तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे प्रस्तुत कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात आली.
तरी दि.27/07/2026 रोजी 13/39 ते 14/39 वा चे दरम्यान कापुरवाडी मंडळअधिकारी कार्यालय, बु-हानगर, ता.जि.अहिल्यानगर येथे लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका श्रीमती पुंड ,मंडळ अधिकारी, कापुरवाडी यांनी तक्रारदार श्री. नासिर गुलाब खान वय- 58 वर्ष, धंदा- ट्रॅव्हल व्यवसाय , रा. मुकुंदनगर, ता.जि. अहिल्यानगर यांच्या मालकीच्या मौजे बु-हानगर येथील गट नं 06, प्लाॅट नं 49 चे क्षेत्र 475 चौ. मी पैकी 210.90 चौ मी क्षेत्राची ची नोंद संगणीकृत करण्याची प्रक्रिया पुर्ण करणे करीता या आधी 1000/-रुपये लाचरक्कम स्विकारले बाबत दुजोरा देवुन उर्वरित 4,000/-रुपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे तसेच तक्रारदार यांनी तहसिल कार्यालयातील श्रीमती पुंडे मॅडम, यांना किती पैसे दयायचे असे लोकसेविका पुंड ,मंडळ अधिकारी यांना विचारणा केली असता, "तिच्या संग बोलु आपण", असे म्हणुन तहसिल कार्यालयातील श्रीमती पुंडे मॅडम यांना लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे लाच मागणी पडताळणी करावाईमध्ये स्पष्ट झाले आहे, म्हणुन यातील लोकसेविका श्रीमती संगिता नारायण पुंड, वय- 37 वर्षे, मंडळ अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय, कापुरवाडी, ता.जि.अहिल्यानगर रा. ई.एम.ई काॅलनी, ता.जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

tejashree vitthal thorat(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
भिंगार कॅम्प पो.स्टे., अहमदनगर

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): tejashree vitthal tho
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):